# भूमी अभिलेख

## १. सीआर/१५४/नागपूर/१४

फिर्यादी हे नागपूर शहरातील रहिवाशी  असून लिगल ॲडव्हायझर म्हणून काम करतात. कुमार हॉटेल लि. या कंपनीच्या खरेदी केलेल्या जमिनीच्या नावाचे नामांतर करण्यासाठीचे अपिल प्रकरण आरोपी लोकसेवक क्र.१ दादासाहेब सोनु तळपे, उपसंचालक, वर्ग—१, भुमी अभिलेख नागपूर प्रदेश नागपूर यांचेकडे प्रलंबित होते.  त्या अपिल प्रकरणामध्ये फिर्यादीच्या बाजूने निर्णय देण्याकरिता आलोसे यांनी रु. ५ लाख रक्कमेच्या लाचेची मागणी केली व सदरची लाच रक्कम रु. ५ लाख आरोपी लोकसेवक क्र. २ भालचंद्र प्रल्हाद गलांडे, चपराशी, वर्ग—४, भूमी अभिलेख नागपूर प्रदेश नागपूर यांच्या मार्फतीने स्वीकारली म्हणून पो.स्टे. सिताबर्डी जि नागपूर शहर गु.र.क्र. ३३४८/१४ कलम ७, १२, १३ (१) (ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येवून दोन्ही आरोपी लोकसेवक यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

आरोपी लोकसेवक क्र.१ दादासाहेब सोनु तळपे, उपसंचालक, वर्ग—१ यांचेविरुध्द पुणे येथे अपसंपदेचा गुन्हा दाखल झालेला आहे.